

# प्रवास सामाजिक जाणिवेचा

लेखक - डॉ.प्रितम हनुमंत दरवडे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# प्रवास सामाजिक जाणिवेचा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# प्रवास सामाजिक जाणिवेचा

लेखक

## डॉ प्रितम हनुमंत दरवडे

# प्रवास सामाजिक जाणिवेचा

## लेखक... डॉ प्रितम हनुमंत दरवडे

फोन नंबर :- ९२८४२८११२६, ९७६२२६६३१८
Email ID :- darwadepritam576@gmail.com
पत्ता :- राऊतवाडी (शिक्रापूर)
तालुका :- शिरूर, जिल्हा:- पुणे
पिनकोड :- ४१२२०८

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २० जून २०२१**

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# प्रवास सामाजिक जाणिवेचा

( मदत कार्याचा थरारक अनुभव )

प्रवास वर्णन

लेखक : डॉ प्रितम हनुमंत दरवडे

फोन नंबर :- ९२८४२८११२६, ९७६२२६६३१८

Email ID :- darwadepritam576@gmail.com

पत्ता :- राऊतवाडी (शिक्रापूर)

तालुका :- शिरूर, जिल्हा:- पुणे

पिनकोड :- ४१२२०८

मनोगत

नमस्कार,

**मी डॉ प्रितम हनुमंत दरवडे**.



ई साहित्य चा मी नियमित वाचक आहे. ई साहित्य वर हे माझे पहिलेच पुस्तक (प्रवास वर्णन) प्रकाशित होत आहे. मला वाचनाची लहानपणापासून आवड आहे. अनेक पुस्तके मी वाचली आहेत. त्यामध्ये " ययाती " ही "कादंबरी" माझी आवडती आहे. व. पु. काळे यांची सुद्धा अनेक पुस्तके मी वाचली आहे. परंतु कॉलेज ला असताना वाचन मागे पडले.

कॉलेज ला असतानाच माझ्यातला कवी जागा झाला. प्रथम वर्षाला असताना आम्हाला " मन " हा विषय होता. मॅडम शिकवत असतानाच मी मनावर एक कविता वाहीमध्ये लिहिली ते मॅडम ने पाहिले. आणि काय लिहिले विचारू लागल्या मी घाबरत काही नाही म्हटलो . पण मॅडम ने ओळखले की मी कविता लिहिली आहे. त्यांनी ती समोर येऊन वाचायला लावली ,घाबरत ती मी वाचाली आणि सर्वांनी जोरदार टाळ्या वाजवल्या . तेव्हापासून कविता लिहू लागलो.

ई साहित्य वर सौरभ वागळे यांच्या डिटेक्टिव्ह अल्फाच्या साहस कथा वाचल्या आणि ई साहित्य वाचनाची गोडी लागली. ई साहित्य वरील प्रवास वर्णने वाचून आपणही आपली प्रवास वर्णन पुस्तक स्वरूपात बनवू शकतो हे समजले आणि ई साहित्य प्रतिष्टान कडे संपर्क केला आणि त्यांनी प्रोत्साहन दिले त्यातूनच हे प्रवास वर्णन मी तुमच्या समोर मांडत आहे.

पुस्तकाची प्रस्तावना माझा मोठा चुलत भाऊ श्री संदीप दरवडे यांनी केली आहे. तो स्वतः ऊत्तम लेखक आणि वाचक आहे. त्याचे खूप खूप आभार आणि नवोदित लेखक, कवी यांना एक चांगले व्यासपीठ निर्माण करून दिले त्याबद्दल ई साहित्य चे मनापासून आभार

डॉ प्रितम हनुमंत दरवडे

प्रस्तावना

व्यक्त होण्याची सुरवात करावी आणि यासाठी लेखनासारखे साधन नाहीच. व्यवसायाने डॉक्टर असलेल्या आमच्या या भावाने त्याचे छोटे अनुभव लिहिण्यास सुरवात केलीय. आंबेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर रस्त्यावर डोंगराच्या कुशीत वसलेल्या गावावर दि. ३० जुलै २०१४ च्या पहाटे सर्व गाव झोपेत असताना संपूर्ण गावावर दरड कोसळून प्रलय आला. या आमच्या डॉक्टर भावाने त्याच्या मित्रांसमवेत अहोरात्र या प्रलयाच्या ठिकाणी मदत कार्य केले.

त्या सर्वांच्या आठवणीतील मदत कार्याचे थरारक असे अनुभव शब्दाने जिवंत केले आहेत. वाचकांना वेगळ्या विषयाची आणि वेगळ्या अनुभवाची शिदोरी नक्कीच हे पुस्तक वाचताना मिळेल. एखादी घटना घडत असताना टी व्ही वर पाहिलेले मदत कार्य आणि प्रत्यक्ष केलेलं मदत कार्य यात खूप फरक आहे याची अनुभूती हे पुस्तक वाचल्यावर येते. हे सर्व आपण पुस्तकाच्या पूर्वार्धात वाचणार आहोत .

नंतर जानेवारी २०२० मध्ये लेण्याद्री आणि जीवधन किल्ल्यावर ट्रेकिंग आणि सहल करून केलेली धमाल उत्तरार्धात वर्णन केलेली आहे. लेण्याद्री, जीवधन गड आणि नानेघाटाची

माहिती आपणास सचित्र स्वरुपात यामध्ये वाचायला भेटणार आहे.

या अनुभवांना शब्दरूप देऊन आपण सर्व वाचकांच्या चरणी हे प्रथम प्रवासवर्णन अर्पण करीत आहोत.या पहिल्या प्रयत्नास अनेक आशीर्वाद.

डॉक्टर प्रितम याने उत्तरोत्तर लिहीत राहण्यास उद्युक्त होऊन मनातले सारे लेखनरूपाने पुन्हा जगावे, ही सदिच्छा.

श्री संदीप दत्तात्रय दरवडे

( कार्यकारी अभियंता महावितरण )

अर्पणपत्रीका

" पहिलेच पुस्तक आहे त्यामुळे हे मी माझे आई वडील यांना अर्पण करतो. तसेच माझे सर्व भाऊ बहीण आणि नातेवाईक जे मला नेहमी प्रोत्साहन देतात. तसेच सर्व मित्र परिवार आणि शेवटी माझ्या लाडक्या बायकोला हे पुस्तक मी अर्पण करतो "

एक होत माळीण , मी पाहिलेले

( मदत कार्याचा थरारक अनुभव )



पावसाळ्याचे ते दिवस होते, सर्वत्र धो धो पाऊस कोसळत होता. ३० जुलै २०१४ चा तो दिवस होता. रात्रपाळी करून नेहमी प्रमाणे सकाळी ८ वाजता घरी आलो. फ्रेश होऊन अंघोळ करून नाष्टा केला, आणि आराम करत टीव्ही पाहत होतो. तेवढ्यात एका न्युज चॅनेल वर बातमी आली की पुणे जिल्ह्यातील आंबेगाव

तालुक्यातील माळीण नावाचे गाव आहे, ते संपूर्ण गाव दरड कोसळल्याने गडप झाले आहे.

ज्यावेळी तिथून नेहमीची जाणारी बस त्या गावाजवळ गेली तेव्हा ते पूर्ण गाव आणि रस्ताच गडप झाला होता. बातमी एकुण च काळजाचा ठोका चुकल्यासारखे झाले. आणि हा हा म्हणता ती बातमी सर्व न्यूज चॅनेल वर आणि संपूर्ण जिल्हा, महाराष्ट्र आणि देशभर पसरली. माळीण गावाचे नाव खर तर प्रथम च ऐकले होते. तरी त्या गावाचे लोक आपले नातेवाईक आहे असा भास होऊ लागला. बातमी जशी न्युज चॅनेल ला आली तशी ती सर्वत्र सोशल मीडिया वर सुद्धा फिरू लागली.....

साधारण दुपारचे १२ वाजले असतील, मी सुद्धा ती बातमी अनेक व्हॉट्सअप ग्रुप ला पाठवली. आमचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सुद्धा ऐका ग्रुप वर ती बातमी टाकली. ती बातमी पाहून अनेकांनी दुःख व्यक्त केले.एव्हाना NDRF पथक त्या ठिकाणी दाखल झाले होते आणि बचाव कार्याला सुरवात झाली होती आशा बातम्या येऊ लागल्या होत्या...

आमच्या ग्रुप वर चर्चा सुरू झाली आणि अचानक एक जण बोलला आपल्याला माळीण ला मदत कार्यासाठी निघायचे आहे.

दुपारचे दोन वाजले होते सर्वांनी जाऊ असे ठरवले, कोण कोण येणार जायचे कसे, याचे नियोजन सुरू झाले. मी डॉक्टर असल्याने सर्व जण बोलले डॉक्टर तुम्ही सुद्धा यायचं आहे आहे. मी सुद्धा निघायला तयार झालो आणि गावामध्ये जमा झालो. एक एक जण करत आम्ही साधारण १५-१६ स्वयंसेवक जायला तयार झालो. परंतु जायचे कसे आणि जायचे कुठे कोणालाच माहीत नव्हते, कारण माळीण गाव कुठे आहे हे माहीत नव्हते, फक्त आंबेगाव मध्ये आहे एवढेच माहीत होते.

छोटा हत्ती ही गाडी एक स्वयंसेवकांची होती ती तो घेऊन आला. आणि आम्ही सगळे जण त्यामध्ये बसलो. प्रवास लांबचा होता म्हणून जाताना मुरमुरे आणि फरसाण बरोबर घेतले. आम्ही जाताना लोणी धामणी मार्गे जाणार होतो.तिथे आमचे पुणे जिल्हा संघचालक डॉ भोसले यांचे हॉस्पिटल होते. जाताना आम्ही त्यांना भेटलो त्यांनी आम्हाला जायचा मार्ग सांगितला आणि आम्ही तिथून संध्याकाळी साधारण ७ वाजता निघालो. प्रवास करत असताना गाडी मध्ये आम्ही मोठमोठ्याने स्फुर्तीगीते म्हणत होतो, त्यामुळे सर्वांना जोश येत होता आणि त्यामुळे प्रवास सुखकर होत होता.

साधारण रात्री ८-८:३० वाजता आम्ही मंचर येथे पोहचलो तिथे एका मंदिरामध्ये थांबलो, कारण आम्हा सर्वांना भूक लागली होती. येताना आम्ही बरोबर मुरमुरे पोते आणि फरसाण घेऊन आलो होतो. सर्वजण त्या मंदिरामध्ये बसून ते खाऊ लागलो. तिथून पुढे मळीण गाव किती लांब आहे रस्ता कसा आहे काहीच कोणाला माहित नव्हते. पोलीस त्या रस्त्याने जाऊन देतील का हे सुद्धा माहित नव्हते आणि पुढे काय दृश्य आहे हे सुद्धा माहित नव्हते.

पुन्हा एकदा आम्ही गाडीत बसलो आणि आमचा प्रवास सुरु झाला माळीण गावाकडे. आंबेगाव मधून आम्ही डिंभे धरणाजवळ आलो. तिथे आम्हाला पोलिसांनी अडवले आम्हला वाटले एवढ्या लांबून आपण आलो आहोत आता जर माघारी जावे लागले तर खूप च अवघड होऊन बसेल. पण आम्ही सांगितले आम्ही संघाचे स्वयंसेवक आहोत आणि मदत कार्यासाठी चाललो आहे. ते एकूण पोलिसांनी आम्हाला सोडले. डिंभे धरणापासून माळीण ४० कि.मी होते.

४-५ तासांच्या प्रवासानंतर आम्ही बरोबर रात्रीचे १२ वाजता माळीण गावात पोहचलो होतो. पाऊस हळू हळू चालू होता त्यामुळे वातावरण गार झाले होते, रात्रीच्या अंधारात खळ खळणाऱ्या

ओढ्याचा आवाज येत होता . गाडी थोडी लांब लाऊन आम्ही १६ जण प्रत्यक्ष घटनास्थळी पोहचलो होतो.

आमच्या समोर ते भयाण दृश्य दिसत होते .एका खूप मोठ्या लाईटच्या प्रकाश झोता मध्ये NDRF चे जवान बचाव कार्य करत होते. एक मोठा पोकलेन जी दरड कोसळली होती त्या दरडीचा मलबा बाजूला सारत होता आणि दुसरा एक जे सी बी तो मलबा बाहेर ढकलत होते. त्या ठिकाणी अनेक गावकर्याच्या किंकाळ्या ऐकू येत होत्या कारण त्या चिखला खाली अनेकांचे नातेवाईक गाडले गेले होते. अनेकांचे संसार त्या खाली गाडले गेले होते. त्यांचा तो आक्रोश पाहवत नव्हता.



NDRF चे जवळ जवळ १५० जवान शोध कार्यात मदत करत होते. त्याच ठिकाणी आम्ही तिथे असलेल्या शाळे मध्ये थांबलो . तिथे गेलो तर आमच्या आधीच काही संघाचे पदाधिकारी मदत कार्यासाठी पोहोचल्याचे समजले.त्यातील आमचे एक प्रचारक आंबेगाव ला त्यांचा प्रवास असल्याने जेव्हा घटना घडली तेव्हा ते लगेच तिथे आले होते.

एक दोन स्वयंसेवक आधीच पोकलेन वर उभे राहून जवानां सोबत शोध कार्यात मदत करत होते. त्यांना पाहून आम्हाला सुद्धा हुरूप आला होता, परंतु आम्ही सोळा जन होतो आणि आधीच तिथे NDRF चे जवान सुद्धा काम करत होते. त्याना मदत कार्यात अडथळा नको म्हणून आम्ही त्या शाळेत थोडा वेळ थांबलो. आमच्या अगोदर आलेले स्वयंसेवक आम्हाला बोलले तुम्ही थकून आला आहात थोडा वेळ आराम करा. आम्ही थोड्यावेळाने आराम करू तेव्हा तुम्ही या.

परंतु समोरचे ते दृश्य पाहून झोप थोडीच येणार होती. आमच्या पैकी अनेक जन तिथेच थांबले आणि मदत कार्य पाहू लागले. NDRF च्या जवानाचे मदत कार्य पाहून आम्हालाही हुरूप येत होता. NDRF चे मदत कार्य खूपच उल्लेखनीय आहे अतिशय शिस्तबद्ध आणि व्यवस्थितपणे कार्य करण्याचे त्यांना प्रशिक्षण

मिळालेले असते. मदत कार्य करत असताना त्यांनी दिवसभरा मध्ये ५–६ मृतदेह जसेच्या तसे बाहेर काढले होते हे आम्हाला समजले.

रात्रीचे २ वाजले होते आणि आम्ही ४-५ जण गाडीकडे येऊन गाडीत आराम करू लागलो . बाकीचे काहीजण मदत कार्य पाहत होते आणि त्यातले २- ३ जण प्रत्यक्ष मदत कार्यात सहभागी सुद्धा झाले होते. आम्ही थोडावेळ आराम केला आणि पहाटे ते ५ वाजता आम्हाला जाग आली, आणि आम्ही पुन्हा घटनास्थळी पोहचलो. आमच्या पैकी २-३ जन प्रत्यक्ष मदत कार्य करत असताना आम्हाला दिसले.

बाकीचे जे मदत कार्य पाहत होते त्याच्याकडून समजले की आमच्या पैकी एक जण मदत कार्य करत होता पोकलेन वर उभे राहून त्याला एका मृतदेहाचा पाय सापडला होता. ते एकूणच अंगावर काटा उभा राहिला होता. कधी एकदा ती रात्र संपून दिवस उगवतो असे झाले होते.

३१ जुलै :-

सकाळी ६ वाजले तेव्हा दिवस उगवत होता आणि संततधार असा पाऊस सुद्धा पडत होता. तरीही जवानांचे मदत कार्य थांबलेले नव्हते आमच्यापैकी अनेकजण पावसात उभे राहून मदत कार्य करत होते. जसा दिवस उजाडला तसे भयानक दृश्य डोळयासमोर दिसू लागले होते.

संपूर्ण डोंगरच जणू त्या गावावर कोसळला होता असे वाटत होते. कारण संपूर्ण गाव त्या खाली गडप झाले होते. आम्ही जिथे उभे होतो तिथे फक्त शाळा दिसत होती. शाळेच्या मागच्या बाजूला २-३ पडकी घरे दिसत होती. शाळे समोरच पाण्याची टाकी होती आणि तिच्यावर उभे राहून काही न्यूज वाहिनीचे पत्रकार वार्तांकन करत होते.

अतिशय निसर्गरम्य असे ठिकाण होते. डोंगर दऱ्यामध्ये वसलेले ते गाव होते. उंचच उंच हिरवे गार डोंगर त्या ठिकाणी दिसत होते परंतु या निसर्ग सौदर्याला न जाणो कोणाची तरी नजर लागली होती.



**NDRF च्या टीम सोबत काम करत असताना स्वयंसेवक .**

NDRF चे जवान जे मदत कार्य करत होते त्याच्यासाठी आणि गावातील लोकांसाठी काही खाद्य पदार्थ आले होते ते शाळे मध्ये ठेवले होते. आम्हाला सुद्धा खूप भूक लागली होती .सकाळी ९ वाजता आम्ही सुद्धा थोडे केळी खाल्ली आणि पोटाला आधार दिला . कारण तिथे दुसरी काहीच खाण्याची सोय नव्हती.

संथ गतीने चालू असलेल्या पावसाने जोर धरायला सुरुवात केली. त्या भरपावसातही जवानाचे आणि आमचे मदत कार्य चालू होते आमच्या मधील ३-४ जण त्या चिखला मध्ये जवानांना मदत करत होते जसे मृतदेह सापडतील तसे ते रुग्णवाहिके मध्ये घेऊन जाण्यास मदत करणे, तसेच ते मृतदेह माळीण जवळच ८ कोलोमीटर असलेल्या आडिवरे या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पोहोचविणे असे काम ते करत होते.

सकाळचे ११ वाजले होते आणि पावसाने पुन्हा जोर धरला होता. तेव्हा मदतकार्य थोडे थांबविले होते. तिथेच जवळ असलेले ग्रामस्थ म्हणू लागले की शाळेमागे जी दरड आहे ती सुद्धा कोसळू शकते. कारण पावसाचा जोर खूप वाढला होता. हे ऐकूण आम्ही सर्व जण घाबरलो होतो. तसेच तिथून निघून जाण्याचा आम्ही त्याक्षणी निर्णय घेतला.

आम्ही एकूण १६ जण होतो त्यापैकी १४ जण गाडीत बसून आलो. उरलेले दोघे जण रुग्णवाहिकेत बसून मृतदेह रुग्णवाहिकेत ठेवून ते पुन्हा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सोडविण्यास मदत करत होते. त्यामुळे आम्ही १४ जण आडिवरे येथे असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आलो.

आमचे काही वरिष्ठ पदाधिकारी त्या ठिकाणी जमा झाले होते. त्यांच्या सोबत काही स्वयंसेवक होते. अम्ही सर्वजण तिथे गोल करून थांबलो. तेव्हा आमचे पदाधिकारी सूचना देऊ लागले, आणि सर्वांना सांगितले, की आपण आता कशाप्रकारे मदत कार्य करणार आहोत, त्यासाठी सर्वांची मदत हवी आहे. त्यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे १० – १२ मृतदेह आले होते. तसेच अजूनही मृतदेह येत होते ते आणण्यासाठी रुग्णवाहिकेत २-३ जन मदतीसाठी जाणार होते आणि बाकीचे स्वयंसेवक ते मृतदेह

रुग्णवाहीकेतून खाली घेण्यास मदत करणार होते, आणि राहिलेलं स्वयंसेवक प्राथमिक आरोग्य केद्रात ते व्यवस्थित ठेवण्यात मदत करणार होते. कारण प्रत्यक्ष घटनास्थळी NDRF च्या टीम चे मदत कार्य सुरु होते परंतु प्राथमिक आरोग्य केद्रात मदतीसाठी अजूनही कोणतीही सरकारी यंत्रणा पोहचली नव्हती. दरम्यानच्या काळात काही राजकीय लोक घटनास्थळी भेट देण्यासाठी जाताना आम्हाला दिसत होते.

आमच्या १४ जणांपैकी मी, पंडित आणि आदिनाथ असे तिघेच जण तिथे थांबण्याचा निर्णय घेतला. बाकीचे ११ जण बोलले आम्ही माघारी जात आहे, आम्ही सुद्धा त्यांना बोललो ज्यांना जायचे आहे त्यांनी जा, त्यामुळे ११ जण माघारी गेले. आम्ही तिघे जण तिथे थांबलो. आमच्या पैकी दोण जण आधीच रुग्णवाहिकेत मदत करण्यासाठी गेले होते. त्यामध्ये जयेश आणि कमलाकर हे दोघे होते. असे मिळून आम्ही पाच जण राहिलो होतो




**प्राथमिक आरोग्य केंद्र. आडिवरे**

आता खरा प्रत्यक्ष मदत कार्य करण्यासाठी माझा हातभार लागणार होता. दुपारचे १२ वाजले होते, जशी रुग्णवाहिका आत मध्ये येईल तसे आम्ही मृतदेह काढण्यसाठी मदत करत होतो. थोड्यावेळाने आम्हाला प्राथमिक आरोग्य केद्र मध्ये जाण्यास सांगितले होते, जिथे प्रत्यक्ष मृतदेह ठेवले जात होते. ते मृतदेह येईल तसे ठेवले होते. ते सर्व व्यवस्थित कपड्यात गुंडाळून ठेवणे गरजेचे होते, कारण त्याची दुर्गंधी सुद्धा यायला सुरुवात झाली होती. खरेतर हा भयानक अनुभव आमच्या तिघांसाठी होता कारण यागोदर मृतदेह जवळून मी सोडून कोणी पहिले नव्हते.

मी कॉलेजला तृतीय वर्षामध्ये असताना आम्हाला पोस्ट मोर्टेम हा विषय होता त्यामुळे त्यानिमित्ताने ससून हॉस्पिटल येथे गेलो होतो, त्यावेळी असे प्रत्यक्ष अनेक मृतदेह जवळून पाहिले होते, त्यानंतर आज दुसर्यादाच जवळून मृतदेह पाहत होतो. बाकीचे दोघे म्हणजे आदिनाथ आणि पंडित हे सुद्धा निडर असल्यामुळे आम्ही मदत करायला सुरुवात केल. जे १०-१२ मृतदेह होते त्यांची ओळख पटवण्यासाठी नातेवाईक यायचे ते त्यांची ओळख पटवायचे त्यानंतर आम्ही ते मृतदेहावर काही दागिने असेल तर ते नातेवाकांकडे द्यायचो आणि मृतदेह पांढर्या कापडामध्ये गुंडाळून त्यावरती सुतळीने बांधून त्यावर क्रमांक आणि नाव लिहून ठेवत होतो. त्यावेळी तेथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे काही लोक सुद्धा तिथे होते तसेच माळीण गावातील अनेक ग्रामस्थ त्या ठिकाणी जमा झाले होते त्यांचा आक्रोश पाहवत नव्हता .

एक एक करत आम्ही मृतदेह व्यवस्थित ठेवत होतो. त्यावेळी एका मृतदेहाच्या चेहऱ्यावर खूप माती होती त्यामुळे ओळख पटवता येत नव्हती म्हणून आम्ही त्याचा चेहरा पाण्याने धूवून काढला. तिथे असलेल्या ग्रामस्थांपैकी महिलांनी मृतदेह ओळखला तो महिलेचा मृतदेह एक अंगणवाडी सेविकेचा होता, असे त्या बोलत होत्या. त्या मृतदेहाच्या केसाम्धेय कंगवा तसाच होता. तेथील महिला म्हणत होत्या की कामावर जाण्यासाठी ती

तयार होत असेल, त्याचवेळी ही भयानक घटना घडली असेल. आम्ही मृतदेह बांधून क्रमांक टाकून व्यव्यास्थित ठेवला. त्यानंतर तिथे आम्हाला फक्त एक पाय च दिसला होता तो खूप फुगलेला होता. मला लगेच आठवले कि रात्री २ वाजता आमच्या पैकी जयेश जो होता, त्याला जवनासोबत काम करत असताना हा सापडला होता . त्याला हात लावला तरी मनाला कसे तरी होत होते. परंतु आम्ही तो पाय ही व्यवस्थित ठेवला अशाप्रकारे आम्ही जवळ जवळ १२ मृतदेह व्यवस्थित बांधून ठेवले होते.

दुपारचे तीन वाजले होते आणि त्याचवेळी सरकारी यंत्रणेतील शवविच्छेदन करणारे कर्मचारी तिथे आले होते. त्यांनी राहिलेले मृतदेह व्यवस्थित करून ठेवले होते. आमच्या पेक्षा त्यांचा स्पीड खूप फास्ट होता कारण ते त्यांचे रोजचेच काम होते. ते पाहून आम्ही तिथून निघून जायचे ठरविले. केल्या कामाचे समाधानही होते आणि एक प्रकारची मनामध्ये भीती सुद्धा होती, कधी घरी जाईल असेल झाले होते.

सकाळपासून काही खाल्ले नसल्याने पोटात कावळे ओरडू लागले होते. त्या गावावरून आंबेगावला जाणार्या सर्व गाड्यासुद्धा बंद केल्या होत्या त्यामुळे. आम्हाला जायचे साधन राहिले नव्हते, आणि आम्ही ज्या गाडीत आलो होतो ती गाडी केव्हाच घरी गेली

होती. आता घरी जायचे कसे हा एकच मनात विचार करत होतो. तिथे असलेल्या बसथांब्यावर आम्ही येऊन थांबलो त्याचवेळी तिथे शेवटची बस आली होती आणि आम्ही त्यामध्ये जायचा विचार केला, पण आमच्या बरोबर आलेले दोघे जण रुग्णवाहिकेतून प्रत्यक्ष घटनास्थळी गेले होते तिथे मोबाईल ला रेंज नसल्यामुळे त्यांच्याशी संपर्क होत नव्हता. दोघेही वेग वेगळ्या रुग्णवाहीकेमध्ये होते. त्यांची वाट पाहत आम्ही बसलो आणि शेवटची असलेली बस सुद्धा निघून गेली.

आता घरी जायचे कसे हा एक मनाला प्रश्न पडला होता आणि दिवसभर काही न खाल्ल्याने पोटात खुप कावळे ओरडू लागले होते काहीच सुचत नव्हते. तेवढ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुण्याचे स्वयंसेवकांची गाडी आलेली दिसली. ते सर्वजण मदत कार्य करण्यासाठीच तिथे आले होते. त्यांनी बरोबर येताना भरपूर बिस्कीट पुडे खायला आणले होते. त्यांनी ते आम्हाला दिले आणि मदत कार्यासाठी प्रत्यक्ष घटनास्थळी गेले. तेवढ्यात आमच्या पैकी एक जण रुग्णवाहिकेतून आल्याचे दिसले त्याला आम्ही सांगितले आपल्याला आता घरी जायचे आहे. तो सुद्धा मग बस थांब्यावर आमच्यासोबत थांबला. आम्ही घरी जायला काही साधन मिळते का हे पाहत थांबलो होतो, परंतु अजूनही आमच्यापैकी एक जण येणे बाकी होते त्याला एकट्याला सोडून जावे वाट नव्हते.

अर्ध्या तासाने तो सुद्धा आला. पण तो आम्हाला पायी येतांना दिसत होता. कारण खूप वेळ रुग्णवाहिका न आल्यामुळे त्याला येता येईना आणि आमच्यापैकी कोणीही त्याला दिसेना, म्हणून तो प्रत्यक्ष घटना घडली त्या माळीण गावातून आडिवरे या गावात पायी चालत आला. म्हणजे जवळ जवळ तो ८ किलोमीटर चालत आला. त्याच्या पायामध्ये त्राणच उरले नव्हते हे दिसत होते त्याला आम्ही बसायला सांगितले आणि हातातील बिस्कीट पुडा त्याला खायला दिला. बिस्कीट पाहून त्याला खूप बरे वाटले कारण त्यांने सुद्धा दिवसभर काही खाल्लेले नाव्हते. आता मात्र आम्हा पाचही जणांना घरी जाण्याची ओढ निर्माण झाली होती पण जायचे कसे हा प्रश्नच होता.

तेवढ्यात आम्हाला एक ट्रक तिकडे जाताना दिसला आणि काही लोक पण त्यात बसताना पहिले. आम्ही पळत जाऊन त्या ट्रक मध्ये जाऊन बसलो. तो ट्रक तिथे असलेल्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी लागणारी लाकडे खाली करून माघारी चालला होता. पाऊस असल्याने खाली बसायची जागा पूर्ण ओली झाली होती. कारण तो ट्रक पूर्ण मोकळा होता . तसेच उभे राहून आम्ही मंचर पर्यंत पोहचलो होतो. रस्त्याने जाताना सारखा रुग्णवाहिकेचा आवाज येत होता. मधेच मोबाईल ला रेंज आली तेव्हा एक न्यूज आली होती की माळीण येथे ढिगाऱ्याखाली एक

छोटा मुलगा जिवंत काढण्यात NDRF च्या जवानांना यश आले होते. तब्बल दोन दिवस तो त्या ढिगाऱ्याखाली कसा राहिला असेल याचाच विचार आम्ही करत होतो. माघारी येताना सतत माळीण गाव चे चित्र डोळयसमोर येत होते. तो कोसळलेला डोंगर, अनेकांचे उध्वस्त झालेलं संसार त्यांच्या संसार उपयोगी वस्तू पाण्यात तरंगताना दिसत होत्या. त्यांची जनावरे, ते सर्व मृतदेह डोळयासमोरून जात नव्हते.

मंचर ला आम्ही संध्याकळी ७ वाजता पोहचलो तिथून आम्हा पाच जणांना दोन वेगवेगळया गाड्या एकापाठोपाठ भेटल्या त्या मध्ये बसून आम्ही चाकण ला आलो. चाकण वरून शिक्रापूरला येण्यास्ठी गाड्यांची वाट पाहत बसलो होतो तेव्हा एक मोठा ट्रक आम्हाला भेटला. पटापट गाड्या मिळाल्या होत्या.

त्या गाडीत बसलो आणि घरी शिक्रापूरच्या दिशेने जाऊ लागलो पण अचानक आता आमचे काही खरे नाही असे वाटू लागेल होते कारणही तसेच होते, त्या गाडीचा ड्रायवर लांबचा प्रवास करून येत होता, त्यामुळे तो थकला होता आणि तो चक्क गाडी चालवता चालवता डुलक्या घेत होता आता मत्र आमची झोप उडाली होती. आमच्यातील एक जण त्याला खूप मोठ्याने

ओरडला आणि तो भानावर आला. त्याला आम्ही नीट गाडी चालव असे बजावले.

रात्री ठीक ९ वाजता आम्ही घरी पोहचलो घरी येऊन अंघोळ करून जेवण करता करता टीव्ही पाहत बसलो होतो तेच आमच्यातील एक जण म्हणजे जयेश NDRF च्या खांद्याला खांदा लाऊन मदत करतानाचा विडियो दिसत होता. ते पाहून आम्ही केलेल्या कामाचे समाधान वाटत होते .

चार ते पाच दिवस माळीण येथे मदत कार्य अहोरात्र सुरु होते. NDRF एवढ्या बिकट प्रसंगी सुद्धा आपल्या प्राणाची बाजी लाऊन मदत कार्य करत होते. आमच्या स्वयंसेवकांच्या वेगवेगळ्या तुकड्या रोज त्यांच्यासोबत मदत कार्य करत होते . अनेक सरकारी यंत्रणा, सेवाभावी संस्था, राजकीय पुढारी स्थानिक लोक त्यांच्या परीने मदत करत होते. सलग ५-६ दिवस हे मदत कार्य चालू होते. जवळ १५१ मृतदेह त्यावेळी सापडले होते. जवळ जवळ ४०-५० कुटुंब त्या ठिकाणी उध्वस्त झाली होती अनेकांचे संसार उघडे पडले होते.

काही दिवसानंतर शासनाने आंबेगाव मधेच माळीण गावाचे तात्पुरते स्थलांतर केले आणि नंतर संपूर्ण गाव त्यांनी तेथे तयार केले. मृत पावलेल्या व्यक्तींच्या आठवणी म्हणून “ माळीण संजीवन स्मारक “ त्या ठिकाणी उभे केले.

माळीण येथे झालेल्या दुर्घटनेत मृत पावलेल्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली आणि तिथे मदत कार्य केलेल्या सर्वांना माझ्या तर्फे सलाम.

# लेण्याद्री, नाणेघाट आणि जीवधनगड ट्रेक

११ जानेवारी २०२०

नमस्कार...

एक महिन्यांपूर्वी ठरलेल्या ११ जानेवरीची आमची ट्रिप आज खऱ्या अर्थाने यशस्वी झाली. KEMHRC बरोबर ची खरेतर ही माझी पहिलीच ट्रिप.

जिवधन गडावर ट्रेकिंगला जायचं म्हटल्यावर खरतर काळजात धस्स !! झाले होते. कारण ट्रेकिंग ला खूप दिवस गेलो नव्हतो. त्यातुन १२ वर्षांपूर्वी हरिशचंद्र गडावर गेलो होतो तेव्हाचा भयंकर अनुभव आठवला. तेव्हाच ठरवले होते की ट्रेकिंग ला जायचं नाही. पण आज तो योग आलाच , मागच्याच आठड्यात राजगडचा पण योग आला होता पण तो काही कारणास्तव कॅन्सल झाला.

आमच्या office च्या एकूण तीन बसेस मिळून जवळपास आम्ही शंभर जण होतो. सकाळी अंदाजे ८ वाजता पुणे, शिक्रापूर आणि वढू अशा तिन्ही ठिकाणावरून बसेस निघाल्या. सकाळी लवकर निघाल्यामुळे नाष्टा बऱ्याच जणांनी केला नव्हता. अंदाजे

१० वाजता आम्ही मंचर जवळ पोहचलो. तीनही गाड्यांचे तेथेच एकत्रीकरण झाले, त्यानंतर लगेचच सर्वांना गरमागरम पोहे आणि समोसे नाष्ट्याला मिळाले. नाष्ट्याची उत्तम सोय मंचर टीम चे सर्व मेंबर यांनी केली.




**नाष्टा केल्या नंतर काढलेला फोटो**

बस मध्ये जाताना मी आणि गणेश ने केलेला झिंगाट, नाद करा पण आमचा कुठं, होऊन जाऊदे नागीण डान्स सगळयांच्या आठवणीत राहिला. बाकीचे सर्व जण गाण्याचा आनंद घेत होते. दुसऱ्या बसेस मध्ये पण धिंगाणा करणारी गाणी चालू होती, सर्वच जण ट्रिप चा आनंद घेत होते.

साधारण ११:३० वाजता आम्ही लेण्याद्री ला पोहचलो. छत्रपती श्री शिवाजी महाराज प्रवेशद्वार जवळ पोहचताच, छत्रपती

शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, हर हर महादेव अशा घोषणा माझ्या तोंडून आपोआपच बाहेर आल्या आणि सर्वानी जोरदार प्रतिसाद पण मला दिला.

तिथे पोहचल्यावर चहा घेऊन आम्ही लेण्याद्री ला गिरीजात्मकाचे दर्शन घ्यायला निघालो. वर पोहचल्यावर सर्वांनी दर्शन घेतले. जो तो सेल्फी आणि ग्रुप फोटो काढण्यात मग्न झाले होते . तेथील लेणी अप्रतिम आणि खूप सुंदर आहे. आम्ही मंदिरातच थोडावेळ थांबुन खाली यायला निघालो.





**लेण्याद्री येथील शिल्प**



खाली आल्यावर आता आपण काही जिवधन गड ट्रेक करू शकत नाही असेच वाटत होते. खाली आल्यावर आमची एके ठिकाणी जेवणाची सोय केली होती. केटरर्स बरोबर च आणले होते, त्यांनी एकदम खमंग अश्या मासवड्या भाकरी आणि लापशी चे जेवण बनवले होते. सर्वांनी मासवड्या वर ताव मारला. जेवणाचे नियोजन मंचर टीम आणि आमचे आयोजक यांनी उत्तम केले होते.

आता महत्वाचा टप्पा म्हणजे नाणेघाट आणि जीवधन गडाकडे आम्ही निघणार होतो. ट्रेकिंग चा श्री गणेशा चांगलाच

झाला होता. साधारण दुपारी २ वाजता आम्ही नाणेघाटाकडे जायला निघालो. तिकडे जाताना उंचच उंच डोंगर रांगा आमचे लक्ष वेधून घेत होत्या. अतिशय निसर्ग रम्य असा तो परिसर होता. रस्ते मात्र थोडे अरुंद होते. उंच डोंगर रांगांचे फोटो बस मधून आम्ही काढत होतो.

ठीक ४ वाजता आम्ही नाणेघाट ला पोहचलो . नयनरम्य असा तो नाणेघाट सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. सर्व जण खाली उतरल्यावर एकत्रित ग्रुप फोटो आम्ही घेतला. त्यानंतर आमचे कॅप्टन (Officer Incharge) डॉ संजय जुवेकर सर यांनी आम्हाला काही सूचना दिल्या, ज्यांना नाणेघाट पाहायचं त्यांनी नाणेघाट पाहावा आणि ज्यांना ट्रेकिंग करायचे आहे त्यांनी ट्रेकिंग ला गडावर जावा.

पण सगळे जण नाणेघाट पाहायला निघून गेले मी पण त्यांच्याबरोबर गेलो, मला वाटलं आज काय ट्रेकिंग होत नाही , कारण ट्रेकिंग ला कोणीच इच्छुक दिसत नव्हते. सगळे जण नाणेघाट पाहायला गेले. तिथे असलेला दगडी रांजण आमचे लक्ष वेधून घेत होता.

नयनरम्य असा नाणेघाट आम्ही पाहत होतो.अतिशय थंड हवा वातावरणा मध्ये होती . कोणी सेल्फी तर कोणी ग्रुप फोटो काढत होते. नाणेघाट पाहून झाल्यावर पुन्हा एकदा एकत्रित ग्रुप फोटो काढला आणि आम्ही बस जवळ आलो.

आता ट्रेकिंग ला जायचे की नाही हा विचार सगळे जण करत होते, कारण खूप उशीर झाला होता, परंतु गडाच्या पायथ्यापर्यंत जाऊ आणि पुन्हा माघारी येऊ असे ठरले. बस गडाच्या जवळ नेल्या. तिथे असणारे गाईड आम्हाला गडाची माहिती देऊ लागले .











गाईड ने माझ्या गळयात अडकवलेला दोरखंड

# जीवधन गड ट्रेक चा थरार

सगळे जण सायंकाळी ४:४५ वाजता गडावर जायला निघाले, वर जाताना जाड असा दोरखंड लागतो, मी गाईड समोरच उभा होतो तर त्यांनी मला तुम्ही पुढे जाणार आहे का असे विचारले आणि माझ्या गळयात तो दोरखंड टाकला. मला जरा स्फुरणच आले, आणि मग जोरदार घोषणा मी दिली आणि तितकाच जोरदार प्रतिसाद मला मिळाला. आणि सुरु झाला आमचा जीवधन गड ट्रेक. पुढे जाताना प्रवीण भंडारे सगळयात पुढे निघाला म्हणूंन तो दोरखंड मी त्याच्याकडे दिला.

केतन, राहुल आणि प्रवीण हे तिघे जण सुसाट निघाले आम्ही त्यांच्या मागे जाऊ लागलो. गडाच्या एकदम पायथ्याला लागल्यावर गाईड ने आम्हाला सांगितले, उजव्या बाजूला वानरलींगी सुळका आहे तिकडे कल्याण दरवाजाने जावे लागते आणि डाव्या बाजूला गडावर जायला जुन्नर दरवाजा आहे. आपण जुन्नर दरवाजा कडून गडाकडे जाऊ.

आणि आमच्या ट्रेक चा थरार सुरु झाला जंगलातून , घनदाट जंगलातून आम्ही छोट्या पायवाटेने चालू लागलो. केतन, प्रवीण,

आणि राहुल गड त्यांच्या ओळखीचा आहे जणू असे पळत सुटले, मी आणि आणखी ४-५ जण त्यांच्या मागे चालू लागलो , खूप दम लागला की थोड थांबायचे आणि पुन्हा ट्रेकिंग चालू असे चालू होते. त्यावेळी गाईड ने सांगितले की दम लागल्यावर खाली न बसता फक्त उभे राहायचे तसेच आम्ही करत होतो.

थोड्यावेळात चालत आल्यावर जंगल संपले आणि गड चालू झाला. मागे वळून पाहतोय तर कोणीच दिसेना, पुढे गेलेले तिघे आणि आम्ही ५-६ लोक सोडले तर कोणीच दिसेना.त्यात दोन तीन महिलासुद्धा होत्या. जोरात आवाज दिला तर एखादा आवाज यायचा पण दिसत कोणी नव्हते. आम्ही विचार केला की आता मागे जायाचे की पुढे.

पुढे गेलेले तिघे बरेच लांब गेले होते म्हणून आम्ही ठरवेल की आता मागे हटायचे नाही शेवटपर्यंत जायचंच आणि जोरात छत्रपती शिवाजी महाराज की जय ,जय भवानी - जय शिवाजी , हर हर महादेव चहा घोषणा दिल्या आणि पुन्हा गड चढू लागलो, आता जंगल सोडून पायऱ्या सुरु झाल्या होत्या त्यामुळे चढायला अवघड जात होते, आणि दम सुद्धा लागत होता म्हणून हळू हळू चालत होतो. पुढे आल्यावर महत्वाचा टप्पा म्हणजे जुन्नर दरवाजा दिसत

होता. उंच असे काळे खडक दिसत होते आणि जायला मात्र वाट दिसत नव्हती. पुढे गेलेले तिघे जण आणि गाईड तिथेच थांबले होते. थोडे पुढे गेल्यावर काळया खडकावरुन हळू हळू सगळे चालत गेलो. तिथून खाली पहिल्यवर आम्ही ज्या ठीकाणावरून अलो तिथे असलेल्या आमच्या बस आणि काही लोक मुंगीसारखे दिसत होते.



**जुन्नर दरवाजा**

गाईड ने सांगितले निम्मा गड चढून झाला आहे इथून पुढे अजून निम्मा गड आहे. आम्ही पूर्ण पणे दमलो होतो तरी सुद्धा वर जायचंच हा निर्धार मनात होता, हळू हळू पुढे सरकू लागलो आणि त्या ठिकाणी येऊन पोहोचलो ज्या ठिकाणी आम्हाला दोरखंडाने वर जायला लागणार होते, आता आम्हाला समजले की त्या गाईड ने दोरखंड का बरोबर घेतला होता. एकाने वर जाऊन तो दोरखंड अडकवला आणि त्यापाठोपाठ बाकीचे हळू हळू वर आलो, आमच्या पाठोपाठ आणखी काही जण आले होते. सर्व मिळून आम्ही १२-१५ जण झालो, त्यामूळे आता आधार वाटत होता.

दरवाज्यातून वर आल्यावर लगेच उजव्या बाजूला २-३ पाण्याच्या टाक्या दिसत होत्या आणि त्यामध्ये भरपूर असे पाणी सुद्धा होते.थोडे वर आल्यावर गडावरून सूर्य अस्ताला जाताना मनमोहक दृश्य दिसत होते ,तो सूर्यास्त होताना चे दृश्य मोबाईल मध्ये टिपले.



जीवधन गडावरून दिसणारा सूर्यास्त

जीवधन गडावरील पाण्याचे टाके



तब्बल दीड तासाच्या ट्रेकिंग नंतर आम्ही गडावर पोहचलो होतो, वर जात असतानाच गाईड ने आम्हाला गडावर जिवाई देवीचे मंदिर आणि धान्य कोठार आहे असे सांगितले होते. गडाच्या मधोमध आल्यावर उजव्या बाजूला जिवाई देवीचे मंदिर होते आणि पुढे सरळ जाऊन खाली धान्य कोठार होते .

( पश्चिम दरवाजाने गडावर पोहोचल्यानंतर समोरच गजलक्ष्मीचे शिल्प आहे. स्थानिक लोक याला "कोठी" म्हणतात. दक्षिण दिशेस जीवाई देवीचे पडझड झालेले मंदिर आहे. आसपास पाण्याची टाकी आहेत. गडाच्या अंतर्भागात एकात-एक अशी पाच धान्य कोठारे आहेत. कोठारामधील कमलपुष्पांचे कोरीव नक्षीकाम आहे. १८१८ च्या शेवटच्या मराठे-इंग्रज युद्धात या कोठारांना आग लागली होती, त्यांची राख आजही या कोठारांमध्ये पहायला मिळते.

आयताकार असणाऱ्या या गडाच्या टोकाला सुमारे २००० फूट उंचीचा "वानरलिंगी" ऊर्फ खडा पारशी नावाचा एक सुळका लक्षवेधी आहे. समोरच नानाचा अंगठा, हरिश्चंद्रगड, हडसर, चावंड आणि कुकडेश्वराचे प्राचीन मंदिर आहे.)



**धान्य कोठाराकडे जाण्याचा मार्ग**

आम्ही धान्य कोठार पाहायला खूपच उत्सुक होतो, पुढे जाऊन खाली उतरून आम्ही धान्य कोठाराच्या दरवाज्या समोर उभे होतो आणि मग पुन्हा एकदा जोरदार घोषणा दिल्या, आणि मी एक पद्य (गीत) म्हटलो

" आम्ही गड्या डोंगरचे राहणार" “चाकर शिवबाचे होणार"

सगळ्याना पुन्हा एकदा जोश आला आणि आत अंधारात मोबाईलच्या टॉर्च लावून एका मध्ये एक असलेली ५ धान्य कोठारे पाहिली आणि खरोखरच त्यामध्ये राख अजूनही शिल्लक होती . तिथे अंधारात मोबाईल च्या प्रकाशात एक ग्रुप फोटो काढला,

आणि खाली जायला निघालो, लवकर खाली जावे लागणार होते कारण दिवस मावळला होता. तेच आमचे भरत सर आणि अमीर दोघे वर येताना दिसले, भरत सर आधी एकदा गडावर आले होते त्यामुळे त्यांना रस्ता माहित होता.

त्याच्याबरोबर आम्ही खाली उतरू लागलो तोपर्यंत काळोख झाला होता. आता आमच्या सर्वांची कसरत होती कारण अंधारात गड उतरायचा होता. मोबाईलच्या टॉर्च लावून आम्ही चालू लागलो. एकदाचा जुन्नर दरवाजा आला आणि मग दोरखंड लावून २ जण खाली उतरले आधी आमच्यासोबत असलेल्या ७-८ महिलांना आम्ही हळू हळू खाली उतरवले आणि आम्ही सर्वजण दरवाजातून खाली उतरलो. तेवढ्यात आम्हाला आमचे कॅप्टन डॉ संजय जुवेकर सर आणि डॉ मकरंद सर आम्हाला शोधत येताना दिसले. ते दोघे जण वानरलिंगी सुळक्याजवळ कल्याण दरवाजातून जाऊन आलेले समजले. ते दोघेही आधी गडावर आले असल्याने त्यांना गडाची माहिती होती. मोबाईल च्या टॉर्च च्या उजेडात आम्ही गडाच्या पायथ्या जवळ आलो थोडा आराम करून पुन्हा मोबाईलच्या उजेडात ग्रुप फोटो काढून आम्ही बस ज्या ठिकाणी लावल्या होत्या त्या ठिकाणी रात्रीचे ठीक ८ वाजता पोहचलो.

गडाच्या खाली आल्यावर समजले की बरेच जण जुन्नर दरवाजा जवळ येऊन गेले आणि त्यांनी सुद्धा ट्रेकिंग चा पूर्ण आनंद घेतला .

खूप भूक लागली होती, जेवणाची उत्तम सोय दुपारच्या सारखीच केली होती, व्हेज आणि नॉनव्हेज दोन्ही प्रकारचे जेवण केटरर्स ने बनवले होते . सर्वानी जेवणाचा आनंद घेतला आणि ठीक ९ वाजता आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो रात्री ठीक १२ वाजता आम्ही घरी पोहोचलो.

अशी एक अविस्मरणीय ट्रिप अतिशय उत्साहात पार पडली. सर्व आयोजक आणि Team KEMHRC चे आणि सहभागी सर्वांचे मनापासून आभार

दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

**कुठे शोधिशी स्वित्झर्लंड**

**अन कुठे शोधिशी काश्मीर?**

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्या-आमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे.

कारण आपण लिहीणार आहात. हो! आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो. याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. ज्या वाटेवर फिरण्यात तुम्हाला आनंद वाटतो तो वाटेचा आनंद वाटेल तेव्हा वाटत रहा.

**सौंदर्याचे निधान आहे**

**तुझ्या गावच्या वेशीवर!**

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com